जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७९७ दिनांक - ०९/११/२०२३**

फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर

## रोहन जयदीप चव्हाण (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०५ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई

दि.११/१०/२०२३ रोजी फिर्यादी हे त्यांचे बुधवार पेठ येथील,दत्त मंदिराचे बाजूचे गल्लीत असलेल्या व्हिडीओ पार्लरचे दुकानात त्यांचे कामगारांसह व्यवसाय करीत असताना तीन अनोळखी इसम हे हातामध्ये लोखंडी तलवार घेवून दुकानात अचानक घुसले व त्यांनी फिर्यादी व त्यांचे कामगार यांना शिवीगाळ करत त्यांना तलवारीचा धाक दाखवून व जीवे मारण्याची धमकी देवून जबरदस्तीने गल्ल्यामधील रोख ५,३६०/- रु. रक्कम चोरून नेली त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **फरासखाना पोलीस ठाणे गुरनं.२१०/२०२३,भादंवि सं कलम ३९२,५०४,५०६** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

दाखल गुन्ह्यातील साक्षीदारांकडे तपास करता त्यांनी सांगितले की,दि.११/१०/२०२३ रोजी व्हिडीओ पार्लर बाहेरील पानटपरीवर व्यवसाय करत असतांना एकूण ०६ अनोळखी इसम हे गाड्यावर आले त्यापैकी ३ अनोळखी इसम हे हातामध्ये लोखंडी हत्यार घेवून व्हीडीओ गेम सेंटरमध्ये येवुन,आज एक-एकाला मारुन टाकु असे म्हणून त्याचेजवळ असलेला लोखंडी हत्यार हवेत फिरवुन,त्यांची दहशत पाहुन आजु-बाजूस असलेले लोक हे भिती पोटी पळून गेले. तसेच इतर ०३ अनोळखी इसम हे साक्षीदाराच्या पानटपरी जवळ येवुन टपरीतील गल्ल्यामधील रोख १७५०/- रुपये काढून घेवुन मोठ-मोठ्याने आरडा-ओरडा व दहशत निर्माण करीत पळून गेले. एकंदरीत झाले तपासावरून नमुद गुन्हयात ०५ आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने,सदर गुन्हयास भादंवि कलम ३९५,आर्म ॲक्ट ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)१३५ व क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ७ अशी कलम वाढ करण्यात आली आहे.

दाखल गुन्ह्याचा तपास करीत असताना यातील आरोपी नामे १)**किरण रमेश गालफाडे,वय-२४ वर्षे,रा. २२६,मंगळवार पेठ,पुणे व २)जतिन संतोष पवार,वय २१ वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे ३)अक्षय संजय सगळगिळे, वय २० वर्षे,रा.लोहगांव,पुणे (टोळी सदस्य) यांना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.** तसेच १) रोहन जयदीप चव्हाण (टोळी प्रमुख) २)ऋषिकेश फुलचंद रवेलिया,वय २१ वर्षे,रा.लोहगांव,पुणे ३)रोहन चव्हाणचा एक साथीदार हे पाहिजे आरोपी आहेत.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना व आरोपींचे पुर्व रेकॉर्ड पाहणी करता **रोहन जयदीप चव्हाण (टोळी प्रमुख)** याने स्वतःचे नेतृत्वाखाली संघटीत टोळी तयार केली असुन त्यामध्ये वेगवेगळ्या साथीदारांना घेवुन टोळीच्या आर्थिक फायदयासाठी परिसरात वर्चस्व अबाधित राखण्यासाठी दरोडा, जबरी चोरी,खुनाचा प्रयत्न करणे अशा प्रकाराचे गुन्हे केले असुन तसेच सदर टोळीने पुणे शहरामध्ये आपल्या टोळीची दहशत निर्माण केली आहे. त्याचे विरूध्द पुणे शहरातील वेग-वेगळ्या पोलीस ठाण्यास गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत त्यांचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करून सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन-१९९९ चे कलम ३(१)(ii)३(२)३(४) अंतर्भाव करणेकामी फरासखाना पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. दादासाहेब चुडाप्पा यांनी पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १ श्री.संदिपसिंह गिल यांचे मार्फतीने अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे श्री. प्रविणकुमार पाटील यांचे कार्यालयात प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून फरासखाना पोलीस ठाणे गु.र.नं २१०/२०२३, भा.दं.वि.कलम ३९५,५०४,५०६ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५,क्रिमिनल लॉ अमेंटमेंट कलम ७ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii)३(२)३(४)अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री.प्रविणकुमार पाटील यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,फरासखाना विभाग,पुणे,श्री.अशोक धुमाळ हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०१,पुणे,श्री.संदिपसिंह गिल, मा.सहा.पोलीस आयुक्त,फरासखाना विभाग, पुणे, श्री.अशोक धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.दादासाहेब चुडाप्पा,पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.मंगेश जगताप व श्रीमती.अनिता हिवरकर, सहा.पोलीस निरीक्षक,वैभव गायकवाड, पोलीस उप-निरीक्षक,निलेश मोकाशी, निगराणी पथकातील पोलीस अंमलदार,तुषार खडके, अजित शिंदे, पंकज देशमुख व शशिकांत ननावरे यांनी केलेली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्वीकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारीक लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली चालु वर्षातील ही ८१ वी कारवाई आहे.**